**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ०५ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. **रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन.**
2. **राज्य विधानसभेतून समाजवादी पार्टीचे अबु असीम आझमी यांचं निलंबन, अवमानकारक वक्तव्यांच्या मुद्द्यावरुन दोन्ही सभागृहात गदारोळ.**
3. **राज्यात सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांच मुद्रांक शुल्क माफ करण्याचा राज्य सरकारचा निर्णय - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.**
4. **भंडारा जिल्ह्यातील चिखला भुमिगत खाणीत अपघात, दोन कामगारांचा मृत्यू, एक जखमी.**

-----------------------------------

**पंतप्रधान मोदी**

**रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. यंदाच्या अर्थसंकल्पाच्या परिप्रेक्ष्यात रोजगार विषयक बाबींविषयी आयोजित वेबिनारला ते संबोधित करत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात या संकल्पनेचा प्रभाव दिसत आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प भारताच्या भविष्याची ब्लूप्रिंट आहे. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि उद्योगांप्रमाणेच रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषालाही प्राधान्य दिलं आहे, असं मोदी म्हणाले .....**

***इन्वेस्टिंग इन पीपल इकोनॉमी ऍन्ड इनोवेशन ये एक ऐसी थीम है जो विकसित भारत के रोडमैप को डिफाइन करती है। इस साल के बजट में आपको इसका प्रभाव भी बहुत बड़े स्केल पर दिख रहा है। इसलिए यह बजट भारत के भविष्य का ब्लूप्रिंट बनकर सामने आया है।***

क्षमतावाढ आणि प्रतिभेला प्रोत्साहन या दोन्ही बाबी देशाच्या प्रगतीसाठी पायाभरणी करतात.त्यामुळे विकासाच्या पुढच्या टप्प्यात आपल्याला या क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक गरजेची असून त्यासाठी संबंधितांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. रोजगार आणि नवोन्मेष क्षेत्रात गुंतवणूक हा चर्चासत्राचा विषय आहे.

-----------------------------------

अबु असीम आझमी-विधानसभा

महाराष्ट्रात समाजवादी पार्टीचे आमदार अबु असीम आझमी यांना चालू अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित करण्यात आलं आहे. एका जाहीर सभेत मुघल शासक औरंगजेबाचं उदात्तीकरण केल्याबद्दल आझमी यांना निलंबित करण्यात यावं असा प्रस्ताव संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला. यावर भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हरकत घेत आझमी यांचं सदस्यत्व विधानसभेच्या पूर्ण कालावधीसाठी रद्द करावं अशी मागणी केली. मात्र सदस्यत्व कायमचं रद्द करणं नियमात बसत नसून यासाठी आमदारांची समिती स्थापन केली जाईल असं आश्वासन चंद्रकांत पाटील यांनी दिलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मुनगंटीवार यांच्या मागणीला पाठिंबा दिला, तसंच छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर अशीच कारवाई करणार का असा प्रश्न सरकारला विचारला. आझमी यांच्या वक्तव्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान झाला असल्याचा आरोप करत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी घोषणा दिल्या. यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष सुरू केला. यावर विरोधकांनी आक्रमक होत घोषणाबाजी केली.राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी विरोधकांनी केली. सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. मात्र कितीही गदारोळ झाला तरी सभागृहाचं कामकाज तहकूब करणार नाही असं विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केलं. त्यामुळे गोंधळातच लक्षवेधी सूचना मांडण्यात आल्या.अबू आझमी यांचं सदस्यत्व अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत रद्द करण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर झाला. अबू आझमी यांचं निलंबन झालं तसंच राहुल सोलापूरकर आणि कोरटकर यांच्यावर कारवाई का झाली नागपूर असा सवाल करत सरकार त्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप नाना पाटोले यांनी केला.........

*अबु आजमीचा आज जसं ज्या पद्धतीने कारवाई त्याच्यावर केली त्याच समर्थन आम्ही केलेलं आहे. पण सोलापूरकर आणि कोरटकर यांनी ज्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला. अशा लोकांवर कारवाई सरकार करत का नाही हा प्रश्न यानिमित्तानं या ठिकाणी उपस्थित होतो.*

-----------------------------------

प्रीपेड मीटर

राज्यातल्या वीज ग्राहकांनाप्रीपेड मीटर लावण्यावर बंदी आहे, त्याऐवजी पोस्टपेड सिस्टीम मीटर लावले जातील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. आधी सगळे फिडर आणि ट्रान्सफॉर्मर वर हे सिस्टम मीटर लावू नंतर ग्राहकांना हे मीटर लावले जातील, लवकरच याचं वेळापत्रकजाहीर करू, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

-----------------------------------

विकास ठाकरे

पश्चिम नागपूरचे आमदार आणि नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी बांधकाम कामगारांसाठी वितरित करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या साहित्याच्या वितरणात मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला आहे. राज्य विधिमंडळाच्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी हा मुद्दा विधानसभेत उपस्थित करत सरकारला जाब विचारला.....

*अध्यक्ष महोदय, बांधकाम कामगारांना आपण विविध योजनांद्वारे अनेक लाभ देतो. शासनाद्वारे बांधकाम कामगारांना जी मदत आपण केलेली आहे ते खरंच लाभार्थी कामगार आहेत की नाही याचा शासनाजवळ  काही रिपोर्ट आहे का? कारण की माझ्या माहितीनुसार जे कामगार नाहीत अशा लोकांनासुद्धा शासनाचा लाभ मिळालेला आहे आणि ती यादी माहितीच्या अधिकारात मिळालेली आहे. या संदर्भात मंत्री महोदय काही चौकशी करतील का हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहेत.*

यावर कामगार मंत्री फुंडकर यांनी याबाबत तपासून योग्य कारवाई करण्याच आश्वासन दिल

-----------------------------------

मुद्रांक शुल्क माफ

शासकीय कार्यालयांमध्ये दाखल कराव्या लागणाऱ्या सगळ्या प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी द्यावं लागणारं पाचशे रुपयांचं मुद्रांक शुल्क माफ करण्याचा

निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यामुळे, जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयतत्व प्रमाणपत्रासह इतर सर्व प्रकारची प्रमाणपत्रं आता एका साध्या कागदावर स्वसाक्षांकित अर्थात सेल्फ अटेस्टेड अर्ज करून मिळू शकतील. दहावी आणि बारावीच्या निकालानंतर विद्यार्थी आणि पालकांचा या सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रांसाठी लागणारा एकूण तीन ते चार हजारांचा खर्च या निर्णयामुळे वाचणार आहे. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देशही बावनकुळे यांनी दिले आहेत.

-----------------------------------

कांदा बीज पिक

वाशिम जिल्ह्यातील गोवर्धन येथील कृषी पदवीधर असलेले शेतकरी भूषण तायडे यांनी शास्त्रोक्त पध्दतीचा अवलंब करून आपल्या कांदा पिकामध्ये मधुमक्षिका आकर्षित करून परागीभवनाचा यशस्वी प्रयोग केला. या प्रयोगाची माहिती दिली आहे आमचे प्रतिनिधी सुनील कांबळे यांनी -

*प्रथमता कांदा बीज पिकाच्या प्लांट शेजारी गूळ आणि पाणी गरम केले. त्याने गुळाच्या पाकातील सुगंध सदर परिसरामध्ये पसरला. उसाचे पाचट टाकून त्यावर गुळाचे पाणी शिंपडले. त्यामुळे मधुमक्षिकांना विषयीरहित खाद्य आणि पाणी मिळाले. त्यातून मधुमक्षिकाने कांदा, बीज उत्पादनात पिकामध्ये वास्तव्य केले आणि परागीकरण सुरळीत झाले असून आता कांदा बीज उत्पादनात वाढ होण्याची शक्यता सदर शेतकऱ्याला वाटते.*

-----------------------------------

सीताबर्डी किल्ला

नागपूरचा प्रसिद्ध सीताबर्डी किल्ला येत्या रविवारी ९ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत जनतेसाठी खुला असेल. ओळखीचा वैध पुरावा सादर करून रेल्वे स्टेशनसमोरील आर्मी रिक्रूटिंग ऑफिस गेटमधून किल्ल्यात प्रवेश देण्यात येईल अशी माहिती डिफेन्स जनसंपर्क अधिकार्यातर्फ़े देण्यात आली आहे.

-----------------------------------

चिखला भुमिगत खाणीत अपघात

भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यातील चिखला इथं  मोइल च्या दोन भुमिगत खाणीत वर्टीकल  लेव्हल 3 मध्ये 100 मीटर खोली असलेल्या ठिकाणी पहिल्या पाळीचे कामगार काम करत असताना साधारण सकाळी 09.00 ते 09.30 च्या

दरम्यान स्लॅब कोसळून ढिगाऱ्याखाली तीन कामगार दबले गेल्याने त्यातील दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला. एका कामगारास उपचारासाठी भंडारा येथील लक्ष हॉस्पिटल येथे पाठवण्यात आल आहे.दोन्ही कामगाराचे मृत देह पोस्टमार्टम करिता सुभाष चंद्र बोस हॉस्पिटल तुमसर पाठवण्यात आलेला आहे. 50 वर्षीय विजय नंदलाल आणि 41 वर्षीय अरुण जीवनलाल चोरमारे अशी मृत व्यक्तींची नावं असून पुढील तपास सुरु आहे.

-----------------------------------

राष्ट्रीय लाईनमन दिन

महावितरणच्या नागपूर परिमंडलात राष्ट्रीय लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने नेत्रदान शिबिर, लाईनमन मेळावे, सुरक्षा कार्यशाळा यासारखे विविध कार्यक्रमांच आयोजन करीत विविध विभागातून अनेक उपक्रमांच्या माध्यमातून परिमंडलातील जनमित्रांचा गौरव करण्यात आला.रौशनी फाउंडेशन, माधव नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने गांधीबाग विभागातर्फे नेत्रदान जागरूकता आणि डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल 104 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. यावेळी 11 कर्मचाऱ्यांनी नेत्रदान करण्याचा संकल्प केला.

-----------------------------------

हवामान

विदर्भात चंद्रपूर इथे आज 39 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये सातत्याने कमाल तापमानात वाढ होते आहे. चंद्रपूर पाठोपाठ अकोला इथे 38.5 तर यवतमाळ, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गडचिरोली या सर्व जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान 37°c च्या पुढे आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 35 आणि 36 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. कमाल तापमानातील वाढ हाताळण्यासाठी स्थानिक महानगरपालिका उष्णता प्रतिबंधक आराखडा तयार करत आहे.

-----------------------------------